# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दुरध्वनी : ०७१२-२६६०९४७ **Email : directornss@sgbau.ac.in**


क्र.संगाबाअवि/१३/५५/२०१७
दिनांक : ०१.०८.२०१७

प्रति,
प्राचार्य/विभागप्रमुख/प्रभारी अधिकारी,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग/
पद्व्युत्तर शैक्षणिक विभागाचे प्रशासकीय केंद्र,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषय : संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजनेंतर्गत आवेदनपत्र पाठविण्याबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र विद्यापीठे प्रावधानानूसार विद्यापीठाची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असेल असे सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्यादृष्टीने आखण्यात आलेले कोणतेही इतर कार्यक्रम, सेवा किंवा उपक्रम यामध्ये सहभागी करण्याची तरतूद उपलब्ध असून विद्यापीठीय शिक्षणाच्या उद्दीष्टांमध्ये विद्यार्थ्याला अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढयापुरते मर्यादित न ठेवता त्याला समाजपयोगी सुसंस्कृत नागरिक घडविणे हे शिक्षणाच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक प्रमुख उद्दीष्ट आहे.

विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास केवळ पुस्तकी या बौध्दिक शिक्षणाने होऊ शकणार नाही, किंबहुना व्यक्तिमत्वाचा विकास हा शरीर, मन, बुध्दी आणि आत्मा या सर्वांच्या संतुलनातून खऱ्या अर्थाने विकसीत होतो. या सर्व बाबींचा विचार करुन काही विद्यार्थीनी ह्या अत्यंत हलाखिचे परिस्थितीतून येत असल्यामुळे त्यांना मुख्यालयी राहण्याची सोय नसल्यामुळे त्यांना बसने ये-जा करावी लागते. त्यांना बस भाड्याची भ्रांत असल्यामुळे त्यांचा शैक्षणिक जीवनावर विपरीत परीणाम होतो. सदर बाबीचा विचार करुन विद्यार्थीनींकरीता “संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना” सुरु केल्याने विद्यार्थीनींना त्याचा प्रत्यक्ष लाभ होईल. याकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाव्दारे व्यवस्थापन परिषदेने दिनांक २७.१०.२०१६ रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये विषय क्र.१५६ अन्वये या योजनेकरीता सोबत जोडलेल्या नियमावलीस मान्यता प्रदान केल्यानुसार नियम तयार केलेले आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेल्या नियमावलीनुसार सोबतचे आवेदन पत्र सत्र २०१७-२०१८ मध्ये आपल्या महाविद्यालयातील पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून भरुन घेवून प्राप्त आवेदन पत्र प्राचार्यांचे स्वाक्षरीनिशी व आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती स्वाक्षांकित करुन संचालक, विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे कार्यालयास दिनांक ३१ ऑगष्ट, २०१७ पर्यत किंवा पूर्वी पोहचेल अशा बेताने पाठवावी.

सोबतचे आवेदनपत्रात विद्यार्थ्यांची माहिती महाविद्यालयामार्फत, प्राचार्यांचे स्वाक्षरीनिशी, आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती स्वाक्षांकित नसल्यास अथवा अपूर्ण माहिती सादर केल्यास तसेच विहित मुदतीत आवेदन पत्र प्राप्त न झाल्यास आवेदन पत्र विचारात घेतले जाणार नाही याची कृपया कटाक्षाने नोंद घ्यावी. सदर माहिती ही विद्यापीठाचे www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर **Students Development** या शिर्षातील **Letter** या उपशिर्षामध्ये उपलब्ध करण्यात आलेली आहे. कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ. अविनाश असनारे)**
प्र.संचालक,
विद्यार्थी विकास
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**सहपत्रः नियमावली व आवेदन पत्र**

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग
### संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना नियमावली

**१) योजनेचे नांव -** या नियमांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ "संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना" या नावाने संबोधले जाईल.

**२) योजनेची अंमलबजावणी-**

सदर नियम व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या तारखेपासून अंमलात येतील.

**३) व्याख्या -** या नियमांमधील उपयोगात आणल्या जाणाऱ्या शब्दांच्या व्याख्या खालीलप्रमाणे राहतील.

**विद्यार्थीनी :** विद्यार्थीनी म्हणजे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या स्थानिक महाविद्यालय/संस्था/पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग/घटक महाविद्यालय/स्वायत्त महाविद्यालय येथे नियमितरित्या पदवी पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेशित असलेली विद्यार्थीनी.

**४) उद्दिष्ट्ये -** या योजनेची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे राहतील.

अ) आर्थिकदृष्टया दुर्बल, गरजु व होतकरु विद्यार्थीनींना उच्च शिक्षण संपादन करण्यासाठी आर्थिक हातभार म्हणून बस पास सवलत योजना.

ब) विद्यार्थीनींचा कल उच्च शिक्षणाकडे वाढविणे.

क) उत्कृष्ठ निकालाची परंपरा कायम ठेवणे.

**५) पात्रता -**

अ) सदर योजनेचा लाभ हा दारीद्र्य रेषेखालील गटातील प्रत्येक महाविद्यालयातून चार विद्यार्थीनींना देण्यात येईल.

ब) सदर लाभधारक विद्यार्थीनी ही महाविद्यालयात नियमित ७५% पेक्षा जास्त उपस्थित असावी.

क) लाभधारक विद्यार्थीनी ही पात्रता परिक्षेत प्रथम प्रयत्नात ५०% पेक्षा अधिक गुणांनी पास असावी.

ड) सदर योजनेचा लाभ हा बिगरव्यावसायीक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थीनीला लागू राहील.

**६) अर्जाचा नमुना व सादर करावयाची तिथी -**

सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थीनींना परिशिष्ट 'अ' नुसार अर्ज संचालक, विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नांव प्रतिवर्षी दिनांक ३१ ऑगस्ट, पुर्वी सादर करणे अनिवार्य राहील. उपरोक्त नमूद तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. परंतु अपवादात्मक परिस्थितीमध्ये कुलगुरूंचे अनुमतीने अर्ज बोलावीणे अथवा स्विकारणे याचे अधिकार संचालक, विद्यार्थी विकास यांना राहतील.

**७) निवड -**

सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य गरजु विद्यार्थीनींचे अर्ज परिशिष्ट 'अ' मध्ये भरुन दि. ३१ ऑगस्ट पर्यंत छाणणी करुन लाभार्थी विद्यार्थीनींचे नांव संचालक, विद्यार्थी विकास ह्यांचेकडे पाठवतील व तसेच वर्षभरासाठी शैक्षणिक दिवसांकरीता लागणाऱ्या पासचे भाडे अंकेक्षित करुन १ सप्टेंबर पर्यंत पाठवतील.

**८) रिक्त जागा -**

संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी किमान चार विद्यार्थीनींचे नांवे लाभार्थी म्हणून व एका विद्यार्थीनीचे नांव प्रतिक्षार्थी म्हणून संचालक,विद्यार्थी विकास ह्यांचेकडे पाठविणे अनिवार्य आहे. निवड करण्यात आलेल्या विद्यार्थीनी मधून कोणत्याही विद्यार्थीनीने कोणत्याही कारणास्तव योजनेचा लाभ नाकारल्यास किंवा तीला तो नियमात बसत नसल्याने अथवा विद्यापीठाने नाकारल्यास प्रतिक्षार्थी विद्यार्थीनी ही ह्या योजनेची लाभार्थी असेल.

**९) लाभ -**

सदर योजनेचा लाभ हा लाभार्थी विद्यार्थीनीला तीचे प्रवेशीत दिनांकापासुन लागु करण्यात येईल. जर त्या विद्यार्थीनीचा प्रवेश हा महीन्याचे २० तारखे नंतर असल्यास लाभार्थीला पुढील महिन्याचे १ तारखे पासुन देय राहील.

**१०) पालकाचे संमतीपत्र -**

सदर योजनेअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थीनीस परिशिष्ट 'ब' मधील संमतीपत्र भरणे अनिवार्य आहे व ते अर्जासोबत जोडावे.

**११) अधिकार -**

सदर योजना राबवितांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यास मा.कुलगुरू हे अधिकारीत असतील. नियमावलीत फेरबदल करण्याचा अधिकार हा मा. कुलगुरूंचा राहील.

**१२) अर्थसहाय्य -**

सदर योजनेअंतर्गत लाभार्थी विद्यार्थीनींना त्यांचे बस भाडे करीता (पास) लागणारे अर्थसहाय्य हे ७०% विद्यापीठ फंडामधुन व ३०% महाविद्यालयाकडुन पुरविण्याची शिफारस या योजने अंतर्गत करण्यात येत आहे. संबधीत महाविद्यालयाकडुन ३०% राशी विद्यापीठाकडे अग्रीम पाठविणे हे ३० जानेवारी पर्यंत प्रति वर्षी अनिवार्य राहील. तसेच सदर राशीचे अंकेक्षण झाल्यानंतर ही राशी ३१ मार्च पर्यंत विद्यार्थीनीच्या बँक खाते मध्ये जमा करण्यात येईल.

बस पास सवलत ही योजना विद्यार्थीनींना परिक्षेच्या कालावधीत सुध्दा लागू राहील. १ एप्रिल ते ३० जुन हा कालावधी परिक्षेचा असल्यास याबाबतचे शोधन हे पुढील सत्रामध्ये विद्यार्थीनीच्या अधिकोष खात्यात जमा करण्यात येईल. याबाबतची देयके संचालक, विद्यार्थी विकास यांचे कार्यालयास १५ जुलै पर्यंत पाठविणे आवश्यक राहील. यानंतर प्राप्त होणाऱ्या देयकांचे शोधन कोणत्याही परिस्थितीत करण्यात येणार नाही.

**(डॉ. अविनाश असनारे)**
प्र.संचालक,
विद्यार्थी विकास
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

***********

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

**संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना** **परिशिष्ट - अ**

**आवेदन पत्र**

**सादर करावयाची अंतीम तिथी - ३१ ऑगस्ट**

**शैक्षणिक सत्र २०   - २०**

विद्यार्थीनीचे प्राचार्याद्वारे स्वाक्षांकित केलेले छायाचित्र येथे लावावे

**प्रति,**
**मा.प्राचार्य/प्राचार्या/विभाग प्रमुख,**
______________________________
______________________________
______________________________

**विषय :** **"संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत" योजनेकरीता नावाची शिफारस करण्याबाबत.....**

**संदर्भ :** संचालक, विद्यार्थी विकास यांचे पत्र क्र.संगाबाअवि/१३/    /२०१७ दिनांक --------------

**महोदय/महोदया,**

मी ________________________________________ शैक्षणिक सत्र २०    - २०    मध्ये आपल्या महाविद्यालयामध्ये/पद्व्युत्तर शैक्षणिक विभागामध्ये __________ या वर्गात प्रवेश घेतला असून उपरोक्त संदर्भांकित विद्यापीठ नियम क्र.    अन्वये **"संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत"** या योजनेअंतर्गत माझी निवड होण्याकरिता संपूर्ण माहितीसह विहीत नमुन्यातील अर्ज संबंधितांकडे शिफरसीसह अग्रेषित करण्याकरीता सविनय सादर करीत आहे. कृपया शिफारस करावी ही विनंती.

| | |
|---|---|
| **१.विद्यार्थीनीचे संपूर्ण नाव** | |
| **२.संपूर्ण पत्ता व संपर्क भ्रमणध्वनी क्रमांक** | |
| **३.महाविद्यालयाचे/शैक्षणिक विभागाचे नाव** | |
| **४.महाविद्यालय व निवासाचे अंतर** | कि.मि. |
| **५.प्रवेशित वर्ग** | |
| **६.रक्तगट** | |
| **७.अधिकोषाबाबतची माहिती** | |
| अ.अधिकोषाचे नांव | |
| ब.अधिकोष शाखा | |
| क.अधिकोष खाते क्रमांक | |
| ड.अधिकोष आय.एफ.एस.सी.क्रमांक | |
| **६.पालकांचे संमतीपत्र जोडले** | आहे / नाही |
| **७.पालकांच्या उत्पन्नाचा दाखला जोडला** | आहे / नाही |
| **८.आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्याचा पुरावा (BPL) जोडला** | आहे / नाही |
| **९.आधार कार्ड क्र.** | |

**स्थळ :**
**दिनांक :**

**विद्यार्थीनीची स्वाक्षरी**

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

---

## संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना

### प्राचार्यांची/विभाग प्रमुखांची शिफारस

**"संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत"** योजनेंतर्गत निवड होण्याकरीता आमच्या महाविद्यालयामध्ये/शैक्षणिक विभागामध्ये प्रवेशित कु./श्रीमती ------------------------ ------------------------------------------------ विद्यार्थीनीचा प्राप्त अर्ज मंजूर करण्याकरीता शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक :
स्थळ : महाविद्यालयाची मुद्रा (प्राचार्याची सही व शिक्का )

प्रति,
संचालक, विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती.

------------------------------------------------------------------------------------------------

**परिशिष्ट - ब**

## संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना
### पालकांचे संमतीपत्र

मी श्री/श्रीमती ------------------------------------------------------

श्री./कु./श्रीमती ------------------------------------------------------------

हिचा पालक/अभिभावक असून तिने संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत या योजनेंतर्गत सादर केलेल्या अर्जास माझी अनुमती आहे व ती विद्यापीठाव्दारे सोपविण्यात आलेली कामे शिस्त व नियमानुसार निष्पादन करेल त्याकरीता मी सदर संमतीपत्र स्वाक्षरी करुन सुपूर्द करीत आहे.

दिनांक :
स्थळ : पालक/अभिभावकाची स्वाक्षरी